# गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि–५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत राज्य विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ च्या महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(परीक्षा व मुल्यमापन मंडळ)**

कॉम्प्लेक्स परिसर, एम.आय.डी.सी.रोड, गडचिरोली–४४२६०५

दुरध्वनी क्रमांक:कार्यालय:०७१३२–२२३३२०
Email: director.boee@unigug.ac.in

जा.क्र./गों.वि./प.व.मु.मं./१३३०/२०२६ दि. ०९/०९/२०२६

## परिपत्रक

विद्यापीठाशी संलग्नित सर्व परीक्षा केंद्राचे प्राचार्य, मुख्यकेंद्राधिकारी व सहकेंद्राधिकारी यांना सुचित करण्यात येते की, परीक्षा केंद्रावर विद्यार्थ्यांकरीता महाविद्यालयामध्ये खालीलप्रमाणे पायाभुत सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात.

- **प्रशस्त व सुरळीत वर्गखोल्या** — परीक्षार्थ्यांना योग्य अंतर ठेवुन बसविण्यासाठी पुरेशी जागा असलेले कक्ष वर्गखोल्यामध्ये सुव्यवस्थित पंखे,लाईट ईत्यादी.
- **बैठक व्यवस्था** — पुरेशा संख्येने बाके,खुर्च्या व लेखनासाठी सोयीस्कर व्यवस्था.
- **विज व प्रकाश व्यवस्था** — अखंड वीजपुरवठा तसेच पुरेसा प्रकाश
- **पिण्याच्या पाण्याची व्यवस्था** — स्वच्छ व सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध असणे.
- **स्वच्छतागृह व्यवस्था** — मुली व मुलांसाठी स्वतंत्र आणि स्वच्छ स्वच्छतागृहे.
- **सुरक्षा व्यवस्था** — परीक्षा सुरळीत पार पाडण्यासठी सुरक्षा कर्मचारी व आवश्यक नियंत्रण व्यवस्था.
- **सीसीटीव्ही देखरेख** —परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता व गैरप्रकारांना आळाघालण्यासाठी.
- **संगणक व इंटरनेट सुविधा** — ऑनलाइन किंवा संगणकाधारित परीक्षासांठी आवश्यक उपकरणे व नेटवर्क
- **दिव्यांगांसाठी सुविधा** — रॅम्प, व्हीलचेअर प्रवेश व इतर आवश्यक सोयी.
- **प्राथमिक उपचार सुविधा** — आपत्कालीन परिस्थितीसाठी प्रथमोपचार पेटी व वैद्यकीय मदतीची व्यवस्था.
- **सुचनाफलक व मार्गदर्शन** — परीक्षार्थ्यांना कक्ष व इतर माहिती सहज मिळण्यासाठी स्पष्ट सुचना.
- **स्वच्छ व शांत वातावरण** — परीक्षेसाठी अनुकुल, शांत आणि स्वच्छ परिसर.

करीता परीक्षा केंद्रामध्ये सर्व पायाभुत सोयी सुविधा उपलब्धतेनुसार प्राचार्य यांनी वरील बाबीची तपासणी योग्य व्यवस्थेमार्फत करून त्याचा अहवाल दिनांक १५/०९/२०२६ पर्यंत विद्यापीठाच्या परीक्षा पुर्व विभागात सादर करावा.

**टिप:— ज्या परीक्षा केंद्रानी वरीलप्रमाणे अहवाल (माहिती) पाठविलेली असेल त्यांनी अहवाल (माहिती) पाठविण्याची आवश्यकता नाही.**

(डॉ.नविन मुंगले)
संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलीपी :—

१) मा.कुलगुरू महोदयांचे स्विय सहाय्यक,गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली यांना माहितीस्तव सविनय सादर.
२) मा.प्र—कुलगुरू महोदय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीस्तव सविनय सादर.
३) मा.कुलसचिव महोदय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीस्तव सविनय सादर.